# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०७/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## पो.स्टे. नरखेड हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड

दिनांक २९/०७/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, मौजा खरसोली येथे लखन उईके यांचे घराचे मागे गल्लीमध्ये खाली जागेत काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे नरखेड येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी खरसोली बस स्टॉपवर सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे–१) लखन केशवराव उईके, वय ३३ वर्ष रा. खरसोली ०२) कमलाकर नागदेवरावजी उईके वय ३४ वर्ष रा खरसोली ३) निखील उमरावजी गजभिये वय ३५ वर्ष रा. खरसोली ०४) अजय वासुदेव उईके वय २९ वर्ष रा खरसोली ०५) सचिन बबन वानखेडे वय ३४ वर्ष रा. खरसोली** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०५ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन आरोपी यांचे अंगझडतीतुन २१४०/– रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे नरखेड येथील ठाणेदार सपोनि कृष्णा तिवारी, पोहवा संजेश मडावी, पोअं. सुरज मोहेकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर